**ठळक बातम्या**

- भारत आणि जॉर्डन यांच्यातले द्विपक्षीय संबंध हे ऐतिहासिक विश्वास आणि भविष्यातल्या आर्थिक संधी यांच्यावर आधारलेले आहेत, असं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- ‘विकसित भारत- रोजगार आणि आजिविका हमी अभियान विधेयक २०२५’ लोकसभेत सादर

- नॅशनल हेराल्ड प्रकरणी काँग्रेस नेते राहुल आणि सोनिया गांधी यांच्याविरूद्ध दाखल केलेल्या आरोपपत्राची दखल घ्यायला दिल्लीतल्या न्यायालयाचा नकार

**आणि**

- १९ वर्षाखालच्या, आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत भारताचं मलेशियापुढं विजयासाठी ४०९ धावांचं आव्हान, भारताकडून अभिज्ञान कुंडूचं द्वीशतक

<><><><><>

भारत आणि जॉर्डन यांच्यातले द्विपक्षीय संबंध हे ऐतिहासिक विश्वास आणि भविष्यातल्या आर्थिक संधी यांच्यावर आधारलेले आहेत. जगाला एका विकासाच्या इंजिनची, विश्वासार्ह पुरवठा साखळीची गरज असून भारत आणि जॉर्डन ती पुरवू शकतात, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज व्यक्त केला. जॉर्डनची राजधानी अम्मान इथं भारत-जॉर्डन व्यापार मंचाला ते संबोधित करत होते.

***होल्ड... बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी***

दोन्ही देशांना कोणकोणत्या क्षेत्रात सहकार्य वाढवता येईल, आणि भूगोलाला संधींमध्ये आणि संधींना विकासात कसं बदलता येईल, याबाबत जॉर्डनचे राजे अब्दुल्ला दुसरे इब्न अल हुसैन यांच्याशी तपशीलवार चर्चा झाल्याची माहिती मोदी यांनी दिली. भारतीय कंपन्या जॉर्डनमार्गे अमेरिका, कॅनडा आणि इतर देशांमधल्या बाजारपेठांपर्यंत पोहोचू शकतात, याचा लाभ भारतीय कंपन्यांनी घ्यावा, असं आवाहन त्यांनी केलं. तसंच जॉर्डनच्या कंपन्यांना भारतात गुंतवणूक करण्याचं निमंत्रण दिलं. डिजिटल पायाभूत सुविधा आणि माहिती तंत्रज्ञान, औषधं आणि वैद्यकीय उपकरणं निर्मिती, कृषी, हरित विकास,

सांस्कृतिक पर्यटन इत्यादी क्षेत्रांमध्ये सहकार्याच्या मोठ्या संधी असल्याचं मोदी यांनी अधोरेखित केलं.

जॉर्डनचं भौगोलिक स्थान, इतर देशांबरोबरचे मुक्त व्यापार करार आणि भारताची आर्थिक क्षमता आणि आधुनिक उद्योग यांच्या जोरावर दक्षिण आशियाला मध्यपूर्व, आफ्रिका आणि युरोपशी जोडणारा आर्थिक कॉरिडॉर होण्याची क्षमता या दोन देशांमध्ये आहे, अशी ग्वाही जॉर्डनचे राजे अब्दुल्ला दुसरे इब्न अल हुसैन यांनी यावेळी बोलताना दिली. या कार्यक्रमादरम्यान भारत आणि जॉर्डन यांच्यात विविध सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या.

प्रधानमंत्री मोदी आज संध्याकाळी इथिओपियाची राजधानी अदिस अबाबाला रवाना होतील.

**<><><><><>**

लोकसभेत आज केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी ‘विकसित भारत- रोजगार आणि आजीविका हमी अभियान विधेयक २०२५’ सादर केलं. हे विधेयक वीस वर्षं जुन्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ मनरेगाची जागा घेईल. हे विधयेक ग्रामीण कुटुंबांना १२५ दिवसांच्या मजुरीच्या रोजगाराची हमी देईल. त्याचबरोबर विकसित भारत २०४७च्या अनुषंगाने एक आधुनिक वैधानिक चौकट तयार करेल. हे मनरेगा विधेयकापेक्षा एक मोठं आणि सुधारित विधेयक असेल. संरचनात्मक त्रुटी दूर करून रोजगार निर्मिती, पारदर्शकता, नियोजन यांना प्रोत्साहन देण्यासाठी हे विधेयक असेल. या नवीन विधेयकाचा उद्देश मजुरांना अधिक हमी, चांगलं वेतन, कामाच्या ठिकाणी संरक्षण तसंच वेतनात अधिक पारदर्शक अंमलबजावणी असल्याचं सरकारने म्हटलं आहे. दरम्यान, काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनी मनरेगाचं नाव बदलण्याच्या सरकारच्या निर्णयावरून काल जोरदार टीका केली. संपूर्ण जगात ख्याती असलेल्या महात्मा गांधींचं नाव काढून टाकण्यामागे सरकारचा नेमका उद्देश काय आहे, असा प्रश्नही गांधी यांनी विचारला.

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज लोकसभेत 'सबका बीमा सबकी रक्षा विधेयक, २०२५' सादर केलं. हे विधेयक विमा कायदा १९३८, भारतीय आयुर्विमा महामंडळ कायदा, १९५६ आणि विमा नियामक आणि विकास प्राधिकरण कायदा, १९९९

यांची सुधारित आवृत्ती आहे. हे विधेयक सभागृहात सादर केलं जात असताना, द्रमुक आणि तृणमूल काँग्रेससह विरोधी पक्षांनी विधेयकाला विरोध केला.

प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत आजपर्यंत एकूण ७ लाख ८६ हजार किलोमीटरपेक्षा जास्त लांबीचे ग्रामीण रस्ते बांधण्यात आल्याची माहिती ग्रामविकास राज्यमंत्री कमलेश पासवान यांनी आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात पुरवणी प्रश्नांच्या उत्तरात दिली. हे ग्रामीण रस्ते बांधण्यासाठी ३ लाख ४६ हजार कोटी रुपये खर्च करण्यात आला असून त्रिस्तरीय गुणवत्ता नियंत्रण यंत्रणेद्वारे त्यावर देखरेख ठेवली गेल्याचं पासवान म्हणाले. त्यानंतर लोकसभेचं कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

देशातल्या राज्य सरकारांनी दोन कोटींहून अधिक अपात्र आणि बनावट शिधापत्रिका रद्द केल्याची माहिती ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांनी आज राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या तासात पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात दिली. देशातल्या सार्वजनिक वितरण प्रणालीच्या लाभार्थ्यांपर्यंत योग्य ते लाभ पोहोचावेत यासाठी ९९ टक्क्यांहून अधिक शिधापत्रिका आधारशी जोडण्यात आल्याचं जोशी यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><>**

नॅशनल हेराल्ड प्रकरणी काँग्रेस नेते राहुल गांधी, सोनिया गांधी आणि इतर पाच जणांविरुद्ध ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयानं दाखल केलेल्या आरोपपत्राची दखल घ्यायला दिल्लीच्या एका न्यायालयानं आज नकार दिला. राऊज ॲव्हेन्यू न्यायालयातले विशेष न्यायाधीश विशाल गोगणे यांनी हा निर्णय दिला. मात्र, कायद्याला धरून तपास सुरू ठेवायचा हक्क ईडीला आहे, असंही त्यांनी सांगितलं. आरोपपत्राची दखल घ्यायला नकार देण्याच्या या निर्णयाविरोधात अर्ज दाखल करणार असल्याचं ईडीनं म्हटलं आहे.

**<><><><>**

१९ वर्षाखालच्या, आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज दुबईत सुरू असलेल्या सामन्यात भारतानं मलेशियापुढं विजयासाठी ४०९ धावांचं आव्हान ठेवलं आहे. मलेशियानं नाणेफेक जिंकून भारताला फलंदाजीसाठी पाचारण केलं. भारतानं निर्धारित ५० षटकात ७ गडी गमावून ४०८ धावा केल्या. त्यात अभिज्ञान कुंडूच्या द्विशतकी खेळीचा मोलाचा वाटा आहे. त्यानं नाबाद २०९ धावा केल्या. त्यात १७ चौकार आणि ९ षटकारांचा समावेश

होता. वेदांत त्रिवेदीनं ९० तर वैभव सूर्यवंशीनं ५० धावांचं योगदान दिलं. मलेशियातर्फे महंम्मद अक्रमनं पाच गडी बाद केले.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा मलेशियाच्या ९ षटकात ३ बाद १८ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने तयार केलेल्या विधानसभा मतदारसंघाच्याच मतदार याद्या वापरल्या जातात. मात्र, त्यातल्या दुबार नावांबाबत राज्य निवडणूक आयोगाने पुरेपूर दक्षता घेण्याचा प्रयत्न केल्याचं राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी काल झालेल्या पत्रकार परिषदेत सांगितलं. मतदार याद्यांतील संभाव्य दुबार मतदारांसंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने सर्व संबंधित महानगरपालिका आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. महानगरपालिकेच्या प्रभागनिहाय मतदार यादीतील संभाव्य दुबार मतदाराच्या नावासमोर दोन स्टार असलेलं चिन्ह नमूद करण्यात आलं आहे. असे मतदार कोणत्या मतदान केंद्रावर मतदान करतील याबाबत स्पष्टता आणण्यासाठी विहित नमुन्यात अर्ज भरून घेण्यात आला आहे. असा अर्ज भरू न शकलेल्या उमेदवारांना मतदानासाठी केंद्रावर गेल्यानंतर हमीपत्र भरून द्यावं लागेल. तसंच त्याची काटेकोरपणे ओळख पटल्यानंतरच संबंधित केंद्रावर मतदान करता येईल, असं वाघमारे यांनी काल स्पष्ट केलं.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राज्यातल्या १२ जिल्हा परिषदांच्या निवडणुका घेण्याची तयारी सुरू आहे. या निवडणुकांसाठी पुरेसं मनुष्यबळ उपलब्ध होण्याच्या दिशेनं लवकरच बैठक घेतली जाणार आहे. त्यानंतर लवकरच या निवडणुका जाहीर होतील, असंही निवडणूक आयोगानं काल जाहीर केलं.

<><><><><>

राज्यात महायुती ५१ टक्के मताधिक्य घेऊन महानगरपालिका निवडणुका जिंकेल आणि २९ महानगरपालिकांचे महापौर हे महायुतीचेच होतील असा विश्वास भाजपचे नेते आणि राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज व्यक्त केला.

//<><><><><>//